आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक २६ जानेवारी २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. ७६व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रपतींच्या हस्ते नवी दिल्लीत ध्वजारोहण संपन्न.
2. राज्याच्या उपराजधानी नागपूर तसेच संपूर्ण विदर्भात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा.
3. मारुती चित्तमपल्ली, चैत्राम पवार, डॉ.विलास डांगरे यांच्यासह अनेक मान्यवरांचा पद्म पुरस्काराने गौरव.
4. केंद्र सरकारच्या एकात्मिक निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीची अधिसूचना जारी.

<u>प्रजासत्ताक दिन राष्ट्रीय</u>

७६ वा प्रजासत्ताक दिन आज सर्वत्र उत्साहाने देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात येत आहे. नवी दिल्लीच्या कर्तव्यपथावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तिरंगा ध्वज फडकावला. देशाच्या सामरिक सज्जतेचं, आणि सांस्कृतिक परंपरेचं समृद्ध दर्शन घडवणाऱ्या संचलनाची मानवंदना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वीकारली. देशाची विविधता आणि सांस्कृतिक एकात्मता दाखवणारे १६ विविध राज्यांचे तसंच इतर मंत्रालयांचे मिळून ३१ चित्ररथही संचलनात सहभागी झाले होते. इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियंतो या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. स्वर्णिम भारत विरासत और विकास ही यंदाच्या संचलनाची संकल्पना होती

<u>प्रजासत्ताक दिन राज्य</u>

परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात आणि इतर सर्वच बाबतीत महाराष्ट्र आघाडीवर असल्याचं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. ७६व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आज मुंबईत शिवाजी पार्क मैदानावर आयोजित मुख्य शासकीय सोहळ्यात ते बोलत होते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करुन सरकारी कामकाज अधिक गतिमान करता येईल, असं ते म्हणाले. लोककल्याणाच्या विविध योजना येत्या १०० दिवसात लागू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत असं ते म्हणाले. राज्यपालांच्या हस्ते यावेळी ध्वजारोहण करण्यात आलं. त्यानंतर राज्य पोलीस दल आणि इतर सुरक्षा दलांच्या संचलनाची मानवंदना राज्यपालांनी स्वीकारली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा या त्यांच्या शासकीय निवासस्थानी राष्ट्रध्वज फडकावून मानवंदना दिली. यावेळी पोलीस

दलाच्या पथकानं राष्ट्रध्वजाला सलामी दिली. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा राज्याच्या जनतेला दिल्या आहेत.

*महाराष्ट्रातील आणि देशातील सर्व जनतेला प्रजासत्ताक दिनाच्या खूप खूप शुभेच्छा. भारतीय प्रजासत्ताक हा चिरायू होतो आणि आमचं संविधान हे जगातल सर्वोत्तम संविधान आहे हे अशाच प्रकारे आम्हाला विकासाचा आणि समतेचा मार्ग दाखवत राहो अशा प्रकारची शुभेच्छा व्यक्त करतो.*

प्रजासत्ताक दिन पुर्व विदर्भ

राज्याच्या उपराजधानी नागपूर तसंच संपूर्ण विदर्भात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. नागपूरच्या कस्तुरचंदपार्क इथं पार पडलेल्या सोहळ्यात महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ध्वजारोहण केले. महसूल विभागाच्या योजना सुलभ पद्धतीने राबविण्यात येत असल्याचे सांगत पीएम किसान योजनेच्या लाभाचे थेट हस्तांतरण, पीक विमायोजनेसाठी पिकांच्या नुकसानीची अचूक नोंद, पीक कर्ज मिळण्यासाठी शेतकरी ओळखपत्र देणारी **ॲ**ग्रीस्टॅक योजना सुरु करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांना राष्ट्रपती विशिष्ठ सेवा पदक जाहीर झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बावनकुळे यांनी पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल अरण्य ऋषी मारुती चितमपल्ली आणिप्र सिद्ध होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ.विलास डांगरे यांचे पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन केले. यावेळी त्यांनी महसूल विभागाच्या भावी योजनांची माहिती दिली ...

*१०० दिवसाच्या कार्यक्रमध्ये महसूल खात्यामध्ये आम्ही या ठिकाणी विचार करतो आहे कि इंटग्रेटेड या ठिकाणी अशी सिस्टिम तयार करतो आहे समजा नागपूरमधे एखाद्याने प्लॉट घेतला तर मुंबईवरुन त्याची रजिस्ट्री करता येईल आता रजिस्ट्रार कार्यालयामध्ये जाण्याची गरज नाही, फेसलेस रजिस्ट्री सुद्धा करण्याचा आम्ही विचार करतो आहे. जेणेकरून चांगल्या सुविधा आपल्याला त्याठिकाणी मुद्रांक शुल्कमध्ये मिळतील, त्यासाठी आपण पुढे जातो आहे.*

वर्धा जिल्हा क्रीडासंकुल इथं आयोजित प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य समारंभात राज्याचे गृह, गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार आणि खनिकर्म राज्यमंत्री तथा वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी ध्वजारोहण केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी

महाराष्ट्राच्या विकासासाठी 100 दिवसाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम सर्व शासकीय विभागाला दिला आहे. या कार्यक्रमानुसार वर्धा जिल्हा सर्वात पुढे राहील यासाठी आपण सर्व प्रयत्न करु या असे आवाहन त्यांनी केलं. शेतकरी, शेतमजूर, आदिवासी, दलित, वंचित, महिला, युवक-युवतीयांच्यासह दुर्बल घटकाला विकासाचा केंद्रबिंदू मानून राज्य सरकार विकासाच्या मार्गावर वाटचाल करीत आहे. यात चंद्रपूर जिल्हा प्रत्येक क्षेत्रामध्ये अग्रेसर राहावा, यासाठी तन-मन-धनाने या जिल्ह्याचा पालकमंत्री आणि राज्याचा आदिवासी विकास मंत्री म्हणून सर्वांगीण विकास करण्यासाठी आपण कटिबध्द आहोत, अशी ग्वाही राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.अशोक उईके यांनी दिली. भंडारा जिल्हा पोलीस मैदानात जिल्ह्याचे पालकमंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. झेंडा वंदनानंतर आयुष निर्माण कारखाना भंडारा इथं झालेल्या भीषण स्फोटात मृत्यूपावलेल्या लोकांना श्रद्धांजली वाहिली गेली. गोंदियाचे पालकमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते गोंदिया शहरातील कारंजा परेड ग्राऊंड ध्वजरोहन सोहळा पार पडला. गडचिरोली इथं प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलिस मुख्यालयाच्या पटांगणावर गडचिरोली जिल्ह्याचे सहपालकमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. नुकत्याच दावोस इथं झालेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या उद्घाटनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात गडचिरोली जिल्ह्यासाठी पहिल्या गुंतवणुकीचा करार करण्यात आला. भविष्यातला ‘स्टील हब’ ही नवी ओळख निर्माण करणाऱ्या गडचिरोली जिल्ह्याचा महाराष्ट्राची अर्थव्यवस्था 2027 पर्यंत 1 ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याच्या ध्येयात महत्त्वाचा वाटा असेल, अशी खात्री जयस्वाल यांनी व्यक्त केली.

<u>प्रजासत्ताक दिन पश्चिम विदर्भ</u>

भारतीय संविधानाने सर्वनागरिकांना घटनात्मक अधिकार दिले आहे. संविधान प्रत्येक भारतीयासाठी महत्त्वाचे आहे, त्यामुळे संविधानाचे प्रत्येकाने वाचन करावे, असे आवाहन उद्योग, उच्च आणि तंत्रशिक्षण, मृदा आणि जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी अमरावती इथं केलं. जवाहरलाल नेहरू स्टेडीयम इथं 76 वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी अनिल बोंडे यांच्या खासदार निधीतून दिव्यांगांना तीनचाकी वाहनाचे वाटप करण्यात आले. अकोल्यामध्ये पालकमंत्री एडवोकेट आकाश फुंडकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अकोला जिल्ह्यात पायाभूत सुविधांची उभारणी गतीने होत असून गत अडीच वर्षांत रस्त्याची 895 कोटी किंमतीची काम मंजुर करण्यात आली. त्यापैकी 91 कामे पुर्ण झाली असल्याची माहिती त्यांनि

दिली. यवतमाळ मध्ये पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा शासकीय कार्यक्रम पार पडला. बुलडाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी बुलडाण्यात ध्वजारोहण केले. जिगांव, राहेरा, आलेवाडी या तीनही सिंचन प्रकल्पाचा तीनशे गावांना लाभ होणार आहे. जिल्ह्यात एकूण ३५ हजार ३११ कोटी रुपयांचे सिंचन प्रकल्प प्रगतीपथावर असल्याचं त्यांनी यावेळी सांगितल. वाशीम इथं राज्याचे वैद्यकीय शिक्षणमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते पोलिस कवायत मैदानावर प्रजासत्ताक दिना निमित्त मुख्य ध्वजारोहण करण्यात आले. आपला जिल्हा निति आयोगाने आकांक्षित जिल्हा म्हणून घोषित केला आहे. ही ओळख पुसण्यासाठी आपण प्रयत्न करु असे मुश्रीफ यांनी यावेळी सांगितल.

<u>पद्म पुरस्कार</u>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला १३९ पद्म पुरस्कारांची घोषणा केली. यंदा ७ पद्म विभूषण, १९ पद्म भूषण आणि ११३ पद्म पुरस्कारांचा समावेश आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी आणि सुप्रसिद्ध गझल गायक पंकज उधास यांना मरणोत्तर पद्म विभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. सुप्रसिद्ध लेखक वनमहर्षी मारुती चितमपल्ली, अभिनेता अशोक सराफ, सुलेखनकार अच्युत पालव, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांवर अल्प दरात उपचार करणारे नागपूरचे होमीओपॅथीक डॉ. विलास डांगरे, गायिका अश्विनी भिडे, बासरी वादक रोणू मुजुमदार, चित्रकार वासुदेव कामत, पर्यावरण वादी कार्यकर्ते चैतराम पवार यांच्यासह माहेश्वरी हॅंडलुम साठी सॅली होळकर, ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या राधा भट, कर्नाटकातले ज्येष्ठ गोंधळी गायक वेंकप्पा सुगतेकर यांना पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. ज्येष्ठ अभिनेता अशोक सराफ यांनाही पद्मश्रीने सन्मानित करण्यात येणार आहे.

<u>एकात्मिक निवृत्तीवेतन योजना</u>

केंद्र सरकारने एकात्मिक निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीची अधिसूचना जारी केली आहे. नवीन निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत सुधारणा करुन या योजनेची घोषणा सरकारने गेल्या ऑगस्टमधे केली होती. ही योजना येत्या १ एप्रिलपासून लागू केली जाईल.एनपीएस अर्थात राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत येणाऱ्या केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना एकात्मिक निवृत्तीवेतन योजना लागू असेल, असं काल जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे. केंद्र सरकारचे सध्याचे कर्मचारी किंवा भविष्यातल्या कर्मचाऱ्यांना एनपीएस अंतर्गत एकात्मिक निवृत्तीवेतन प्रणाली निवडण्याचा पर्याय असेल.

## हवामान

नागपुरात आज 15 अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे.

******